# अजितदादा सार्वजनिक बांधकाम विभागाचा मागील दोन वर्षांचा आढावा घ्या

## दादा तुमचा किंवा पीएचा व्हॉटस्‌ॲप नंबर प्रसिद्ध करा पुरावे सादर करू, सार्वजनिक बांधकाम विभागाची भयान अवस्था



### जे उपविभागीय अधिकारी तेच शाखा अभियंता आणि जे शाखा अभियंता तेच कार्यकारी अभियंता यांचे पीए, बोगसगिरी उघडकीस कशी येणार?

### सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकारी, शाखा अभियंता अनेक वर्षांपासून ठाण मांडून याचाही पाठपुरावा करण्याची गरज

बीड । दिव्य रिपोर्टर

उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजितदादा पवार यांनी पालकमंत्री पदाचा पद्‌भार घेतल्यापासून अधिकारी वर्गात दादाचा दरारा दिसून येतो परंतु काही अधिकारी दादांसमोर भेदरून रहायचे आणि दादा गेल्यानंतर वाघासारखे डरकाळी फोडत असल्याचे दिसत आहे. विशेष म्हणजे अजितदादा यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचा गेल्या दोन वर्षाचा आढावा घेण्याची गरज असून सार्वजनिक बांधकाम विभागाची भयान अवस्था झालेली दिसून येत आहे. जे उपविभागीय अधिकारी आहेत तेच शाखा अभियंता आहेत आणि जे शाखा अभियंता आहेत तेच कार्यकारी अभियंता यांचे पीए आहेत. जर कुठे बोगस कामे झाली असतील आणि या अधिकाऱ्यांच्या निदर्शणास आणून दिल्यानंतरही बोगसगिरी उघडकीस कशी येणार? यासाठी जबाबदार अधिकाऱ्यांना पीएचा पद्‌भार द्यावा, शाखा अभियंत्यांना शाखा अभियंताच राहू द्यावे अशी सर्वसामान्यातून मागणी होत आहे.

आज सोमवारी अजितदादा बीडला येणार म्हणून प्रशासकीय यंत्रणा सज्ज झालेली आहे. एकटे अजितदादा कोणकोणत्या विभागाचा कारभार पाहणार यासाठी अजितदादांनी स्वत:चा किंवा आपल्या पीएचा मोबाईल नंबर प्रसिद्ध करावा, जेणेकरून सर्वसामान्य आपल्या अडचणी व कार्यालयात होणारी बोगसगिरी पुराव्यासहीत व्हॉटस्‌ॲपवरून पाठवू शकेल. तसेच सार्वजनिक (पान २ वर)

### माहिती देण्यास टाळाटाळ गुत्तेदारांना अंगावर घालण्याचा प्रयत्न

बीड जिल्हा गुंडगिरीच्या दृष्टीकोनातून बदनामीकडे वाटचाल करत असताना सार्वजनिक बांधकाम विभागात एखादी माहिती मागितली तर सुरुवातीला देण्यास टाळाटाळ करतात, ज्या कामाची माहिती मागितली संबंधित गुत्तेदाराला अधिकारी माहिती मागितल्याचे वृत्त पोहोचवितात. यातून संबंधित गुत्तेदार पत्रकारांना किंवा माहिती मागणाऱ्यांना दबावात घेण्याचा प्रयत्न करतो, ही अत्यंत गंभीर बाब असून यातून माहिती मागणाऱ्याच्या किंवा पत्रकाराच्या जिविताला धोका होवू शकतो, दादांनी या बाबीकडेही लक्ष देण्याची गरज आहे.

### दादा तुम्ही पुरावे मागतात आम्ही सादर करायचे कसे?

मागील काही दिवसांपूर्वी अजितदादांच्या बैठकीत एका पत्रकाराने एका विभागाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित करून प्रश्न विचारल्यानंतर अजितदादा सरळ म्हणाले की, पुरावे सादर करा, तसेच जर पुरावे सादर करायचे असेल तर अजितदादांनी स्वत:चा व्हॉटस्‌ॲप किंवा त्यांच्या विश्वासू व्यक्तीचा व्हॉटस्‌ॲप नंबर प्रसिद्ध करावा जेणेकरून सर्वसामान्यांच्या गरजा आणि इतर बाबी दादापर्यंत पोहोचतील. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागामधील काही अधिकारी राजकीय दबावात काम करत असल्याचे दिसून येते. यासंदर्भात तक्रारीही झालेल्या आहेत. याचाही दादांनी पाठपुरावा करण्याची गरज आहे.

सत्यमेव जयते

साप्ताहिक दिव्य आधार

https://epaper.divyaaadhar.com

संपादक : शेख रिजवान
मो. 9561840184 rizwanshaikhekmat33@gmail.com



ग्राऊंड रिपोर्टींग पान ४ वर

बीड वर्ष १२ वे, अंक ३७, सोमवार, दि. १९ मे २०२५ RNI/MAHMAR/2013/54433 पाने-४ किंमत १ रुपया

# गुत्तेदार, कन्स्ट्रक्शन कंपनी बोगस जीएसटीच्या कचाट्यात

## मार्च महिन्यात अनेकांची फसवणूक झाल्याचा संशय

### पुन्हा बनावट कागदपत्रांच्या आधारावर ट्रेडर्स, एंटरप्रायजेस, हार्डवेअर, ट्रेडिंग कंपनी तयार करून जीएसटी टॅक्सचा गेम केल्याची शंका

### हिंगोली, मालेगाव, वसमत, नाशिक, बीड असे ॲड्रेस टाकून बोगस ट्रेडर्स, एंटरप्रायजेस, ट्रेडिंग कंपनी सुरू केल्याचा संशय

बीड । दिव्य रिपोर्टर

एखाद्या अज्ञात व्यक्तीच्या नावावर ट्रेडर्स, एंटरप्रायजेस, हार्डवेअर, ट्रेडिंग कंपनी तयार करायची आणि वरील कंपन्यांच्या नावाने गुत्तेदार व कन्स्ट्रक्शन कंपनींना बिले द्यायचे, शासकीय कामांची बिले हमखास मार्च महिन्यात दिली जातात. त्याचवेळी अशा बोगस कंपन्यांचे रॅकेट सक्रीय होवून शासनाच्या जीएसटी टॅक्सला चुना लावत असल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे काही बोगस किंवा कागदोपत्री कामे करणारे या रॅकेटचे बळी पडतात. मध्यंतरी जीएसटी टॅक्स विभागाने असे रॅकेट उघडकीस आणून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करून मोठा टॅक्स वसूल केला होता. त्यावेळी काही प्रमाणात अशा बोगसगिरी करणाऱ्यांवर लगाम लागला होता परंतु आता पुन्हा बनावट कागदपत्राच्या आधारावर ट्रेडर्स, एंटरप्रायजेस, हार्डवेअर व ट्रेडिंग कंपनी तयार करून जीएसटी टॅक्स बुडविणारे रॅकेट सक्रीय झाले असून याकडे जीएसटी विभागाने लक्ष देण्याची गरज आहे.

ट्रेडर्स, एंटरप्रायजेस, हार्डवेअर व ट्रेडिंग कंपनी अशाप्रकारे या बोगस कंपन्या सुरू असून या कंपन्यांचे ॲड्रेस हिंगोली, मालेगाव, वसमत, नाशिक, बीड असे असल्याचे दिसून येते. एखाद्या अज्ञात व्यक्तीचे आधारकार्ड, पॅनकार्ड मिळवायचे आणि त्या अज्ञात व्यक्तीच्या नावाने वरील कंपन्या सुरू करायच्या. हमखास काही गुत्तेदार मार्च महिन्यात आपली बिले सादर करण्यासाठी या अशा बोगस कंपन्याकडून टक्केवारी देवून बिले घेतात, त्यावेळी या कंपन्या जीएसटीसह आम्ही तुम्हाला बिले देवू असे आश्वासन देवून ते बिले जीएसटी नंबरसहीत गुत्तेदारांना देतात. गुत्तेदार नियमाने ते बिले मार्च महिन्यात शासनाला सादर करून आपण काम केलेली रक्कम उचलतात. अशाप्रकारे हा फंडा सुरू असल्याची शंका व्यक्त केली जात असून मध्यंतरी टॅक्स विभागाने असे रॅकेट उघडकीस आणले होते. यातून टॅक्स विभागाने अशा बोगसगिरी करणाऱ्यांवर कारवाई करून त्यांच्याकडून जीएसटी टॅक्सची दंडासहीत रक्कम वसूल केली होती. त्यानंतर त्या बोगस एजन्सी बंद झाल्या होत्या. परंतु काही ट्रेडर्स, एंटरप्रायजेस, हार्डवेअर व ट्रेडिंग कंपनी आजही या बोगसगिरीत सक्रीय असल्याचे दिसून येत असून दिव्य आधार लवकरच याचा पाठपुरावा करणार आहे.

### मनसेचे राज्यउपाध्यक्ष या प्रकरणी तक्रार करणार

मध्यंतरी मनसेचे राज्यउपाध्यक्ष अशोक तावरे यांनी काही बनावट कागदपत्राच्या आधारावर सुरू असलेल्या एजन्सी विरोधात तक्रार दिली होती परंतु सदरील तक्रारीला तथ्य नसल्याने त्या तक्रारी अर्जावर पुढे कारवाई झाली नाही परंतु यंदा अशा बनावट ट्रेडर्स, एंटरप्रायजेस, ट्रेडिंग कंपनी व हार्डवेअर अशा कंपन्यांची अशोक तावरे जीएसटी विभागाकडे तक्रार करणार असून लवकरच अशा बोगस कंपन्यांची यादी टॅक्स विभागाकडे सादर करणार असल्याची माहिती अशोक तावरे यांनी दिव्य आधारला दिली.

# मोटार ड्रायव्हिंग स्कूलमध्ये ओटीपीतून गेम होत असल्याचा संशय

## काही ड्रायव्हिंगस्कूलमध्ये फक्त कागदोपत्री ट्रेनिंग सुरु असल्याचा संशय

### मागील दोन महिन्यांत ड्रायव्हिंग लायसन्स दिलेल्या ग्राहकांचे मोबाईल लोकेशन तपासण्याची गरज

### ड्रायव्हिंग स्कूलमध्ये ट्रेनींगसाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांचे फिटनेस किंवा इतर बाबी तपासण्याची गरज

### ड्रायव्हिंग स्कूलचे कार्यालय नियमाने योग्य आहे का? आरटीओ यांनी कार्यालयाचीही तपासणी करणे आवश्यक

बीड । दिव्य रिपोर्टर

ग्राहकांना आरटीओ कार्यालयातून वाहनाचे परवाने देण्यापूर्वी वाहनधारकांना योग्यरित्या वाहन चालविता येणे गरजेचे आहे. यासाठी आरटीओ कार्यालयातून मोटार ड्रायव्हिंग स्कूल यांना मंजूरी देण्यात आलेली आहे. बीड शहरात अंदाजे २५ ते ३० ड्रायव्हिंग स्कूल असून या स्कूलमधून वाहनधारक ट्रेनिंग घेवून प्रमाणपत्र घेतात. त्या प्रमाणपत्राच्या आधारावर आरटीओ वाहनधारकांचे टेस्ट घेवून वाहनधारकांना परवाने देतात. परंतु काही मोटार ड्रायव्हिंग स्कूल चालक फक्त कागदोपत्री वाहनाची ट्रेनिंग देत असल्याची शंका असून ओटीपीच्या माध्यमातून मोठा गेम होत असल्याची शंका व्यक्त केली जात आहे. जर वाहन चालविण्याची ट्रेनिंग योग्य मिळत नसेल तर अपघाताच्या प्रमाणात वाढ होणारच यासाठी आरटीओंनी या बाबीकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे.

वाहनाचे परवाने घेण्यापूर्वी प्रत्येक वाहनधारकांना मोटार ड्रायव्हिंग स्कूलमधून ट्रेनिंग घेणे बंधनकारक आहे. वाहनधारकाने लर्निंग लायसन काढल्यानंतर सर्वप्रथम एखाद्या मोटार ड्रायव्हिंग स्कूलमध्ये प्रशिक्षणसाठी दाखला घेणे आवश्यक आहे. या स्कूलमध्ये तब्बल २६ दिवस वाहनधारकांना ट्रेनिंग दिली जाते. यात दररोज वाहन चालविणे त्याशिवाय कार्यालयात बसून रस्त्यावरील दिशादर्शकाचे अभ्यास करणे अशाप्रकारे ही ट्रेनिंग असते. दररोज वाहनचालक स्कूलमध्ये येणार आणि ड्रायव्हिंग स्कूलमधील प्रशिक्षण देणाऱ्या सोबत वाहन चालविणार यासाठी ऑनलाईन तरतूद करण्यात आलेली आहे. ज्यावेळी वाहनचालक स्कूलमध्ये येणार त्यावेळी वाहनचालकाची ऑनलाईन नोंद होते. दररोज अंदाजे पाच किलोमीटर वाहन चालवून आल्यानंतर एक दिवसाचे प्रशिक्षण पूर्ण होते. ▶▶ पान २ वर...

### वाहने आणि कार्यालय तपासा

ज्या वाहनात बसून प्रशिक्षणार्थी वाहनचालकांना ड्रायव्हिंग स्कूलमधून ट्रेनिंग दिली जाते ते वाहन चालविण्यास योग्य आहे का? तसेच त्या वाहनाचे फिटनेस, इन्शुरन्स, पीयुसी त्याशिवाय इतर बाबी योग्य आहे का? याचीही आरटीओंनी तपासणी करण्याची गरज असून ड्रायव्हिंग स्कूल कार्यालय कसे असावे? याचेही नियम आहेत.प्रशिक्षणार्थ्यांना वाहन चालविण्याची ट्रेनिंगसोबत कार्यालयात बसून दिशादर्शकाचे अभ्यास करणे अत्यावश्यक आहे. त्यादृष्टीकोनातून मोटार ड्रायव्हिंग स्कूलचे कार्यालय परफेक्ट आहे का? याचीही आरटीओंनी तपासणी करण्याची गरज आहे.

### डिप्लोमा होल्डरच्या नावावर ड्रायव्हिंग स्कूल आहे ते डिप्लोमा होल्डर ट्रेनिंग देतात का?

मोटार ड्रायव्हिंग स्कूलची मंजूरी घेण्यासाठी मोटार मेकॅनिकल डिप्लोमा डिग्री असणे आवश्यक आहे. नियमाने मोटार ड्रायव्हिंग स्कूलची मंजूरी घेणारे मेकॅनिकल डिप्लोमा झालेल्या व्यक्तीचे प्रमाणपत्र जोडूनच स्कूलची मंजूरी घेत असावेत. परंतु सध्या ते डिप्लोमा होल्डर मोटार ड्रायव्हिंग स्कूलमध्ये प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी स्वत: उपस्थित राहतात का? किंवा या डिप्लोमा होल्डर व्यक्तीने आपले प्रमाणपत्र फक्त भाडेतत्वावर संबंधित स्कूलला परवानगी मिळविण्यासाठी दिले? याचीही आरटीओंनी चौकशी करणे गरजेचे आहे.

# नशेसाठी औषध आणि गोळ्या विकणाऱ्या रॅकेटचा फर्दाफाश; बीड शहर पोलिसांची उत्कृष्ट कामगिरी

बीड । दिव्य रिपोर्टर

शहर पोलिसांनी मागील वर्षी सहा महिन्यापूर्वी शहरांमध्ये नशेच्या गोळ्या आणि औषध विकणारे रॅकेट पकडले होते, त्यानंतर हा उद्योग बंद पडला होता. परंतु त्यानंतर पुन्हा एकदा नवीन लोकांनी या डोके काढल्याची माहिती काल बीड शहर पोलिसांना मिळाली होती. यावरून काल रात्री अकरा वाजता जुना बाजार येथील हाफिस गल्ली येथे फैजान खान याच्या राहते घरी छापा मारला असता तेथे नशेसाठी वापरात येणाऱ्या औषध गोळ्यांचा मोठा साठा मिळून आला. हीच औषधे नशे करण्यासाठी लोकांना विकत असल्याची खात्री पटली होती. त्यासोबत खालील आरोपी तेथे मिळून



आले. फैजान खान राहणार हाफिस गल्ली, सोहेल खान राहणार, हाफिस गल्ली, शोएब खान राहणार हत्तीखाना, शेख फिरोज राहणार गिराम गल्ली कारंजा यांना मुद्देमाला सह ▶▶ पान २ वर...

### बॅच नंबरवरून कंपनीला पत्रव्यवहार करा

बीड शहर पोलीसांनी झोपेच्या गोळ्या व कोडीनयुक्त खोकल्याचे औषधाचा तब्बल अडीच लाख रुपयांचा साठा जप्त केला. या औषधांचा नशेसाठी मोठ्या प्रमाणात वापर होत आहे. बीड पोलीसांनी औषध प्रशासनाच्या मध्यस्थीने या पकडलेल्या औषधांवरील बॅच नंबरवरून संबंधित कंपनीला पत्रव्यवहार करून सदरील औषधे संबंधित कंपनीने कोणत्या एजन्सीला विक्री केली होती. त्यानुसार बीड पोलीसांनी पुढे पाठपुरावा करण्याची गरज असून संबंधितांनी ही औषधे कोणाकडून खरेदी केली याचा छडा लावण्याची गरज आहे.

# अग्निशामक विभागाकडून खासगी हॉस्पिटलला दिलेल्या एनओसी संशयाच्या विळख्यात

## अनेक नियमांची पायमल्ली करत या एनओसी दिल्याचा संशय

### काही खासगी हॉस्पिटलला दिलेल्या एनओसीची अवधी संपलेली, अग्निशामक विभागाने अशा हॉस्पिटलच्या तपासण्या करण्याची गरज

### होजपाईप, पाणीसाठा, डबल जिना, लिफ्ट, अग्निशामक वाहन फिरविण्यासाठी जागा, पार्किंगची व्यवस्था या सर्व बाबी तपासून एनओसी दिल्यात का? याचा आढावा घेण्याची गरज

बीड । दिव्य रिपोर्टर

खासगी हॉस्पिटल, मॉल किंवा इतर मोठे व्यवसाय सुरू करायचे असेल तर अग्निशामक विभागाकडून एनओसी घेणे बंधनकारक आहे. अग्निशामक विभागाकडून एनओसी घेण्यासाठी हॉस्पिटल, मॉल किंवा हॉटेल ▶▶ पान २ वर...

### खासगी फायर एजन्सीच्या एनओसी घेवून हॉस्पिटल सुरू

अग्निशामक दलातून एनओसी घेणे असेल तर हॉस्पिटलची इमारत नियमाने उभी करावी लागते. अनेक नियमाचे पालन करूनच अग्निशामक दलातून एनओसी मिळते म्हणून काही हॉस्पिटल चालक अग्निशामक दलातून एनओसी न घेता खासगी फायर एजन्सीतून एनओसी घेवून आपले काम चालवितात. नियमाने हे योग्य असले तरी अग्निशामक दलातून एनओसी घेणे बंधनकारकच आहे. परंतु नियमाचे पालन होत नसल्याने काही हॉस्पिटलचालक खासगी एनओसी घेत असल्याची चर्चा असून अग्निशामक विभागाने सर्वच हॉस्पिटलच्या तपासण्या करणे गरजेचे आहे.

# धनंजय मुंडेंनी घेतली शिवराज दिवटेची भेट

## दिवटे कुटुंब माझ्या घरातले, शिवराजच्या आरोपींवर कठोरात कठोर कारवाई करावी -आ.धनंजय मुंडे

अंबाजोगाई । दिव्य रिपोर्टर

दोन दिवसांपूर्वी परळी तालुक्यात मारहाण झालेल्या शिवराज दिवटे या तरुणाची अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालयात जाऊन माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी भेट घेत त्याच्या तब्येतीची विचारपूस केली तसेच शिवराज व त्याच्या कुटुंबीयांशी संवाद साधत त्यांना धीर दिला.

शिवराज दिवटे याला परळी तालुक्यात एका टोळक्याने केलेल्या मारहाणीनंतर तू सध्या स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण ▶▶ पान २ वर...



# जिल्ह्यात कुऱ्हाड बंदी तर मग एवढ्या मोठ्या प्रमाणात आरा गिरणी कशा सुरू?

## जोपर्यंत कटसाईझ लाकडांची तस्करी थांबणार नाही तोपर्यंत वृक्षतोड सुरूच राहणार

### बीड जिल्ह्यात एकूण १०५ आरा गिरण्या त्यापैकी बीड आणि नेकनूर परिसरात सर्वात जास्त आरा गिरणी असल्याची मिळाली माहिती

### जिल्ह्यातील आरा गिरण्यांची क्रॉसचेकींग करण्याची गरज, अनेक आरागिरणी फॉल्टी असल्याचा संशय

### आर्थिक व्यवहारातून या आरागिरणींना दरवर्षी नूतनीकरण करून दिले जात असल्याची शंका

बीड । दिव्य रिपोर्टर

जिल्ह्यात एकूण १०५ पेक्षा जास्त आरा गिरणी असल्याची माहिती मिळाली असून त्यापैकी ३५ ते ४० टक्के आरागिरण्या बीड आणि नेकनूर हद्दीत आहेत. जिल्ह्यात कुऱ्हाडबंदी असतानाही एवढ्या मोठ्या प्रमाणात आरागिरण्या कशा सुरू आहेत? हा चौकशीचा भाग असून जोपर्यंत कटसाईझ लाकडांची तस्करी थांबणार नाही तोपर्यंत वृक्षतोड ▶▶ पान २ वर...

### पोलीस, वाहातूक पोलीस, वनविभागाचे भरारी पथक, वनपाल, आरटीओ यांच्या निदर्शणास ही वाहने का येत नाहीत

जिल्ह्यात एकूण १०५ आरा गिरण्या आहेत. त्यापैकी बीड शहरात ३० ते ३२ आरा गिरण्या सुरू असून नेकनूर परिसरात ६ आरा गिरण्या सुरू आहेत. यातील काही आरा गिरण्यांची पाहणी केली असता या आरा गिरण्यात मोठ्या प्रमाणात वृक्ष तोडून आणून ठेवलेले दिसतात. ज्या पद्धतीने बीड जिल्ह्यात कुऱ्हाडबंदी आहे तर मग ही वृक्षतोड कधी होते? तसेच वृक्षतोडीनंतर या तोडलेल्या वृक्षांची वाहातूक कधी होते? विशेष म्हणजे बीड शहर व नेकनूर हद्दीत मोठ्या प्रमाणात पोलीस, वाहातूक पोलीस, वनविभागाचे भरारी पथक तैनात आहे. याशिवाय वनपाल व आरटीओ हे पण सतत रस्त्यावरच असतात तर मग हे वृक्षतोड केलेली वाहने या अधिकाऱ्यांच्या निदर्शणास का येत नाहीत? हा अभ्यासाचा विषय असून पोलीस अधीक्षक नवनीता कॉंवत यांनी याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

पान १ वरून

### अजितदादा सार्वजनिक बांधकाम

बांधकाम विभागात गेल्या अनेक वर्षांपासून अधिकारी, शाखा अभियंता ठाण मांडून आहेत. अजितदादांनी या अधिकाऱ्यांच्या बदलीच्या अनुषंगाने पाठपुरावा करण्याची गरज असून सार्वजनिक बांधकाम विभागाची भयान अवस्था झालेली आहे. यासाठी अजितदादांनी मागील दोन वर्षांचा आढावा घेतला तर सर्व बाबी उघडकीस येतील.

### मोटार ड्रायव्हिंग स्कूलमध्ये ओटीपीतून

अशाप्रकारे २६ दिवस हे प्रशिक्षण दिले जाते. परंतु काही ड्रायव्हिंग स्कूलमध्ये कागदोपत्रीच ही ट्रेनिंग दिली जात असल्याची चर्चा असून विद्यार्थ्यांची ऑनलाईन नोंद होते. त्यावेळी विद्यार्थ्यांच्या मोबाईलवर एक ओटीपी नंबर येतो. काही प्रशिक्षण देणारे ते ओटीपी नंबर मोबाईलवरून मागून घेतात आणि दररोज असाच गेम होत असल्याची शंका व्यक्त केली जात आहे. ओटीपी नंबरमधून मोठा गेम होत असून या गंभीर बाबीकडे आरटीओंनी लक्ष देण्याची गरज आहे. गेल्या दोन महिन्यांत ज्या वाहनधारकांना परवाने देण्यात आले त्या वाहनधारकाचे मोबाईल लोकेशन तपासले तर ओटीपीचा खेळ संपुष्टात येवू शकतो. यासाठी आरटीओंनी विशेष मेहनत घेण्याची गरज आहे.

### अग्निशामक विभागाकडून

याची इमारत कशी असावी अशा अनेक बाबी तपासूनच अग्निशामक विभाग संबंधितांना एनओसी देते. परंतु मागील काही वर्षांपूर्वी अग्निशामक विभागाने अनेक खासगी रुग्णालयांना एनओसी दिल्याची बाब समोर आली असून या दिलेल्या एनओसी संशयाच्या विळख्यात दिसून येत आहेत. या एनओसी देण्यापूर्वी अग्निशामक विभागाने अनेक नियमाची पायमल्ली केली असल्याची शंका व्यक्त केली जात असून अग्निशामक विभागाने ज्या रुग्णालयांना एनओसी दिलेली आहे त्या रुग्णालयाची फेरतपासणी करण्याची गरज असल्याचे दिसून येते.

महात्मा ज्योतीबा फुले आरोग्यदायी योजना मिळविण्यासाठी नियमाने त्या हॉस्पिटलला अग्निशामक दलाची एनओसी असणे बंधनकारक आहे. ही अट असल्याने अनेक हॉस्पिटल चालकांनी तात्काळ अग्निशामक विभागातून एनओसी घेण्यासाठी धडपड केली. गेल्या दोन वर्षांपूर्वी उपस्थित अधिकारी यांनी त्या हॉस्पिटलची पाहणी करून त्यांना एनओसीही दिली. जे हॉस्पिटल नियमात आहे त्यांना अग्निशामक विभागातून मिळालेली एनओसी योग्य मिळाली असेल परंतु काही हॉस्पिटलमध्ये होजपाईप, पाणीसाठा, डबल जिना, लिफ्ट, अग्निशामक वाहन फिरविण्यासाठी जागा, पार्किंगची व्यवस्था अशी व्यवस्था नसतानाही अग्निशामक विभागाने एनओसी दिली असेल तर एकप्रकारे अग्निशामक विभागाने नियमाची पायमल्ली करून ही एनओसी दिली म्हणावी लागेल किंवा अग्निशामक विभागाच्या अधिकाऱ्याने आर्थीक उलाढाल करून ही एनओसी दिली असल्याचीही शंका व्यक्त केली जात आहे. या दृष्टीकोनातून आताच्या अग्निशामक विभागातील अधिकाऱ्यांनी एनओसी दिलेल्या हॉस्पिटलची फेरतपासणी करण्याची गरज असून काही हॉस्पिटलची एनओसी दिलेली अवधी संपलेली असतानाही त्या हॉस्पिटलने या एनओसीची मुद्दत वाढवून घेतली का? याचीही या दृष्टीकोनातून पाहणी करण्याची गरज आहे.

**महात्मा ज्योतीबा फुले आरोग्यदायी योजनेसाठी एनओसी बंधनकारक**

नियमाने महात्मा ज्योतीबा फुले आरोग्यदायी योजना हॉस्पिटलला मंजूर करून घ्यायची असेल तर अग्निशामक विभागातून एनओसी घेणे बंधनकारक आहे. त्या दृष्टीकोनातून मागील काही वर्षांपूर्वी काही हॉस्पिटल चालकांनी अग्निशामक विभागाला निवेदन करून एनओसी घेतलेली आहे. परंतु या दिलेल्या एनओसी नियमात बसून देण्यात आल्या का? याचीही चौकशी करणे गरजेचे असून काही हॉस्पिटलमध्ये अग्निशामकदलाची एनओसी नसतानाही महात्मा ज्योतीबा फुले आरोग्यदायी योजना मिळालेली असून या हॉस्पिटलला एनओसी नसतानाही ही योजना मिळाली कशी? याचीही उच्चस्तरीय चौकशी करण्याची गरज आहे.

### जिल्ह्यात कुऱ्हाड बंदी तर

सुरूच राहणार हे मात्र खरे आहे. या भरमसाठ वृक्षतोडीमुळे बीड परिसरातील पर्यावरण विभाग व वनविभाग धोक्यात आले असून वनविभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी बीड जिल्ह्यातील खास करून नेकनूर आणि बीड शहरात असलेल्या आरा गिरण्यांची क्रॉसचेकींग करण्याची अत्यंत गरज असून मोठ्या आर्थिक व्यवहारातून काही फाल्टी आरागिरण्यांना बढावा देण्याचे काम वनविभागातून होत असल्याचे दिसून येत आहे.

बीड व नेकनूर परिसरातील काही आरागिरण्यामधून कटसाईझ लाकूड तयार करून ते कटसाईझ लाकूड बेंगलोर किंवा परराज्यात पाठविले जात असल्याची चर्चा असून जोपर्यंत कटसाईझ लाकडांची तस्करी थांबणार नाही तोपर्यंत वृक्षतोड सुरूच राहणार हे मात्र खरे आहे. यासाठी वनविभागाने कटसाईझ लाकडांची तस्करी थांबविणे गरजेचे वाटते. जिल्ह्यात एकीकडे कुऱ्हाडबंदी असल्याचे घोषीत करायचे आणि दुसरीकडे भरमसाठ वृक्षतोड होत असलेली उघड्या डोळ्याने पहायचे असे काही चित्र पहावयास मिळत आहे. तसेच काही अधिकारी सांगतात की, बाभळाचे झाड तोडण्यास बंदी नाही परंतु नियमाने ज्याअर्थी कुऱ्हाडबंदी आहे तर बाभळाचे झाड तोडणेही चुकीचेच वाटते. परंतु अनेक आरागिरण्यात भरमसाठ लाकूड ठेवलेले दिसून येत असून यासाठी वनविभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील काही आरागिरण्यांची क्रॉसचेकींग करणे गरजेचे वाटत आहे. तसेच दरवर्षी या आरागिरण्यांचे नूतनीकरण केले जाते. त्यावेळी या आरागिरण्यांची नियमाने पहाणी होते. काही गिरण्या फाल्टी असल्याचेही शंका असून अशा फाल्टी गिरण्यांना आर्थिक व्यवहारातून नूतनीकरण करून दिले जात असल्याची शंका व्यक्त केली जात असून वरील सर्व प्रकरणांची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी चौकशी करणे गरजेचे आहे.

### नशेसाठी औषध आणि

रंगीहात पकडले आहे. त्यांच्याकडून दोन लाख ५४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. मागील काही दिवसात शहरांमध्ये अशाप्रकारे अतिशय काटेकोर गुप्तता पाळून नशेचे औषध आणि गोळ्या चोरून लपून विक्री चालू होती. यामध्ये बऱ्याचदा लहान मुलांना सुद्धा अशा प्रकारचे नशेची औषध गोळ्या पुरवल्या जातात. यातून गुन्हेगारीची वाढ होत आहे असे लक्षात आल्यानंतर पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी अशा प्रकारचे रॅकेट शोधून काढून कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यातून कालचा हा छापा मारून कारवाई करण्यात आली आहे.

सदरील कारवाई पोलीस अधीक्षक श्री नवनीत कावत अपर पोलीस अधीक्षक श्री सचिन पांडकर उपविभागीय पोलिस अधिकारी श्री विश्वंभर गोल्डे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री शितल कुमार बल्लाळ, पोलीस अंमलदार सचिन अलगट, जयसिंग वायकर, सुशेन पवार, मीरा रेडेकर, मनोज परजणे, अश्फाक सय्यद, सखाराम माने यांनी केली आहे . ही कारवाई केल्यामुळे बीड शहर पोलीस स्टेशनचे नागरिकाकडून कौतुक होत आहे.

### धनंजय मुंडेंनी घेतली शिवराज

रुग्णालयात उपचार घेत असून त्याच्यावर सुरू असलेल्या उपचारांची ही धनंजय मुंडे यांनी स्वरातीचे अधिष्ठाता डॉक्टर धपाटे यांच्याकडून माहिती घेतली. शिवराज सह संदिपान दिवटे व दिवटे कुटुंब हे माझ्या घरातील असल्यासारखे आहेत, सुरज ला मारहाण केलेल्या संपूर्ण ठोक्यावर कठोरात कठोर कारवाई करावी अशी मागणी यावेळी धनंजय मुंडे यांनी केले असून. बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी यासंदर्भात ठोस भूमिका घेतली आहे पुढे तपासांती सर्व गोष्टी स्पष्ट होतील. तसेच या प्रकरणात कुठेही जाती धर्माचा काहीही संबंध येत नाही असे स्वतः एसपींनी देखील स्पष्ट केले असल्याचे धनंजय मुंडे यावेळी माध्यमांशी बोलताना म्हणाले. आपण शिवराज व दिवटे कुटुंबीयांच्या पाठीशी आहोत, पोलीस योग्य तो तपास करतील आणि आरोपींना कठोर शिक्षा मिळेल, असा विश्वास असल्याचे धनंजय मुंडे यावेळी म्हणाले. यावेळी माजी आ.संजय दौंड, ज्येष्ठ नेते राजकिशोर मोदी, रा कॉ चे तालुकाध्यक्ष राजाभाऊ औताडे, विश्वंभर फड, भागवत तावरे यांसह आदी उपस्थित होते.

# पीएम रिलीफ फंड भारत सरकारसाठी गुळभिले दाम्पत्याने दिला एक महिन्याचा पगार

**पोलीस उपनिरिक्षक राजाभाऊ गुळभिले व त्यांच्या पत्नी जि.प.शिक्षिका निता गुळभिले यांचा देशहितासाठी पुढाकार**

बीड । दिव्य रिपोर्टर

सुपरस्टार अक्षय कुमार यांनी सुचविल्यानुसार मोदी सरकारने घेतलेला आणखी एक चांगला निर्णय तो म्हणजे भारतीय सैन्याला व देशाला मजबूत करण्यासाठी फक्त एक रुपया देशासाठी देणे या सुचनेवरून सर्वसामान्य नागरिक सरसावला असून यातच बीड दहशतवाद विरोधी शाखेचे पोलीस उपनिरीक्षक राजाभाऊ गुळभिले व त्यांच्या पत्नी तथा जि.प.शिक्षिका निता गुळभिले यांनी आपला एक महिन्यांचा पगार देवून देशहितासाठी पुढाकार घेतला आहे. पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या प्रेरणेतून गुळभिले दाम्पत्यांनी हा पुढाकार घेतल्याचे त्यांनी सांगितले.

पेहलगाव जम्मू कश्मिर येथे पाकिस्तानी दहशतवादी यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यात निष्पाप नागरिकांचे बळी गेलेले आहेत. त्याचे प्रतिउत्तर म्हणून भारत सरकार यांनी ऑपरेशन सिंदुर राबवून भारतीय सैनिकांनी पाकिस्तानी अतिरेकी संघटना व दहशतवादी संघटना यांचा नायनाट केला आहे. सदरच्या ऑपरेशन सिंदुरमध्ये काही भारतीय सैनिक शहीद झालेले आहेत. या अनुषंगाने भारतीय सैन्यदलाला अधिक बळकटी देण्यासाठी भारत सरकार यांचे पीएफ रिलीज फंडमध्ये राजाभाऊ गुळभिले व त्यांच्या पत्नी निता गुळभिले एक महिन्यांचा पगार देण्याची दृढ इच्छा जाहीर करून संबंधित विभागाला पत्राद्वारे कळविले आहे. राजाभाऊ गुळभिले यांच्या देशहितासाठी घेतलेल्या पुढाकाराने सर्वसामान्यांनी कौतूकाची थाप देवून त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.



### राजाभाऊ गुळभिले राष्ट्रपती सन्मानचिन्हाने सन्मानित

राजाभाऊ गुळभिले यांचे वडील, चुलते, भाऊ, मेहुणे असे त्यांच्या कुटुंबातील आठ ते दहा सदस्य ज्यांनी भारतीय सैन्यदलात कर्तव्य निभावले आहे. तसेच राजाभाऊ गुळभिले हे पोलीस विभागात कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. त्यासाठी त्यांना सन २०२१ मध्ये भारत सरकारचे मा.महोदय राष्ट्रपती यांचे सन्मानचिन्ह देवून सन्मानित करण्यात आलेले आहे. यातून हे सिद्ध होते की, गुळभिले यांच्या रक्तातच देशासाठीची तळमळ असून त्यांनी एक रुपयाच्या जागी आपला एक महिन्यांचा पगार देवून ते पुन्हा सिद्ध केल्याचे दिसून येते.

# झेडपीत बदल्यानंतरही पुन्हा तिथेच कामकाज; पदभार काढण्यासाठी सत्ताधारी पक्षाचे नेते सरसावले

**राष्ट्रवादीचे नेते बळीराम गवते यांचे सीईओंसह पालकमंत्री अजित दादांनाही पत्र**

बीड । दिव्य रिपोर्टर

जिल्हा परिषदेत प्रशासकिय बदली होऊनही कर्मचाऱ्यांना पुन्हा त्याच ठिकाणी अतिरिक्त कामकाजाच्या नावाखाली पदभार दिले जात आहेत. तब्बल ७७ कर्मचारी दहा वर्षांपासून एकाच ठिकाणी काम करत असल्याने संबधित विभागात अनागोंदी निर्माण झालेली आहे. यामुळे संबधितांचे अतिरिक्त पदभार काढावेत, अशी मागणी सत्ताधारी राष्ट्रवादी पक्षाचे नेते बळीराम गवते यांनी सीईओ आणि पालकमंत्री अजित पवार यांच्याकडे केली आहे. तसे सविस्तर पत्रही दिले आहे.



पत्रात म्हटले आहे, जिल्हा परिषद बीड अंतर्गत ७७ कर्मचारी यांची एकाच कार्यालयात १० वर्षपेक्षा जास्तु सेवा झालेली असल्याने शासन नियमाप्रमाणे त्यांची एका तालुक्यातून दुसऱ्या तालुक्यातील कार्यालयात प्रशासकीय बदली झालेली आहे, असे असताना हे कर्मचारी विविध मार्गाने अतिरिक्त कार्यभाराच्या नावाखाली पुन्हा पुन्हा त्याच मुळ कार्यालयात कामकाज करीत आहे. अशा प्रकारचे अतिरिक्त कार्यभाराचे आदेश हे जिल्हा परिषदेतील काही अधिकारी व कर्मचारी यांच्या संगनमताने निर्गमित केले जातात. हे कर्मचारी गेल्या १० वर्षापासून एकाच कार्यालयात कार्यरत असल्यामुळे मोठ्या प्रमाणात अनियमितता होण्यासाठी कारणीभूत आहेत. याबाबत अनेक वेळा तक्रारी होऊन सुध्दा अधिकारी वर्ग या कर्मचाऱ्यांना पाठीशी घालत आहेत. सदर प्रकरणात लक्ष घालून विविध कारणाने वर्षानुवर्षे एकाच कार्यालयात ठाण मांडून बसलेल्या अधिकारी व कर्मचारी यांचे हे अतिरिक्त कार्यभाराचे आदेश रद्द करुन त्यांना त्यांच्या मुळ आस्थापनेच्या ठिकाणी कामकाज पाहण्याबाबत आपले स्तरावरुन आदेशीत करण्यात यावे, भविष्यात अशा प्रकारच्या प्रशासकीय अनियमितता होवू नयेत, यासाठी ज्या ज्या अधिकारी/कर्मचारी यांनी असे अतिरिक्त पदभाराचे आदेश काढलेले आहेत, त्या सर्वावर आपले स्तरावरुन उचित कार्यवाही व्हावी, असेही म्हटले आहे.

### उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्हा पालकमंत्री अजित पवार यांचा दौरा कार्यक्रम

बीड । दिव्य रिपोर्टर

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री श्री. अजित पवार उद्या सोमवार, दि. १९ मे रोजी एक दिवसाच्या बीड जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम खालील प्रमाणे.

सकाळी ८:०५ वाजता शक्तीकुंज वसाहत मैदान, थर्मल परळी वै. हेलीपॅड वर आगमन नंतर मोटारीने प्रयाण. सकाळी ८:१५ वाजता श्रीक्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग मंदिर येथे आगमन. ८:१५ वाजता श्रीक्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग दर्शन त्यानंतर मोटारीने प्रयाण.सकाळी ९:०० वाजता शासकीय विश्रामगृह, परळी, जिल्हा बीड येथे आगमन. सकाळी ९.०० वाजता वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत श्री. क्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्र विकास आराखडा व परळी औद्योगिक औष्णिक केंद्राचे सादरीकरण यावर चर्चा. नंतर मोटारीने प्रयाण. सकाळी १०.३० वाजता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई, जिल्हा बीड येथे आगमन. सकाळी १०.३० वाजता सादरीकरण. नंतर बाह्य विभागाची नूतनीकृत इमारत तसेच मुलांच्या वस्तीगृहाच्या नूतनीकृत इमारतीची पाहणी. नंतर स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय बी-बिल्डींग सर्जिकल वार्ड व नूतन मॉड्युलर ऑपरेशन थिएटरचे लोकार्पण. नंतर मोटारीने प्रयाण. सकाळी ११.३० वाजता श्री. राजकिशोर मोदी यांचे निवासस्थान, गुरुवार पेठ, अंबाजोगाई, जिल्हा बीड येथे आगमन. सकाळी ११.३० ते १२.३० राखीव.

दुपारी १२.४५ वाजता कृषी महाविद्यालय अंबाजोगाई येथील हेलिपॅड येथे आगमन. दुपारी १२.५० वाजता हेलिकॉप्टरने बीडकडे प्रयाण. दुपारी १.१५ वाजता पोलीस परेड ग्राउंड येथील हेलिपॅड पोलीस मुख्यालय बीड येथे आगमन. नंतर मोटारीने प्रयाण.

# परीक्षा काळातील वडिलाचे छत्र हरपले तरी सुद्धा ध्येय गाठले

दहिगांव । दिव्य रिपोर्टर

गेल्या काही दिवसांत इयत्ता दहावी या परीक्षेचा निकाल जाहीर झाला ता शेवगाव येथील व सर्व स्तरातील या वर्षी च्या नुकत्याच झालेल्या एस.एस. सी.बोर्ड परीक्षा मार्च २०२४/२५ या शैक्षणिक वर्षाचा नवजीवन माध्य,व उच्च माध्यमिक विद्यालय दहिगाव ने (ता. शेवगाव) चा निकाल ७६.३५ टक्के लागला आहे.सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा पालक व मार्गदर्शन करणा-या शिक्षकांचा व या परिक्षा काळातील साथ देणाऱ्या सर्व सहकाऱ्याचे विद्यालयाच्या वतीने सत्कार समारंभ आयोजित केला होता



यामध्ये विद्यार्थीनी कु जगताप भक्ती दत्तात्रय या विद्यार्थीनी ८८.६० टक्के घेतले आणि एक सांगण्याची बाब म्हणजे या परिक्षा दरम्यान पित्याचे छत्र हरपले तरी सुद्धा हिने शाळेतुन चौथ्या क्रमांकावर बाजी मारली आहे आणि या जिवनातील मुख्य पाया म्हणजे दहावी होय इथपर्यंत येण्याचे धाडस तिने पुर्ण केले ग्रामीण भागातील विद्यार्थी मेहनती व हुशार असतात, हे पुन्हा एकदा भक्तीने दाखवून दिले आहे. भक्तीने आज आपल्या गावाचे आणि शालेचे नाव वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले आहे. तिच्या यशात तिची जशी मेहनत महत्त्वाची आहे तसेच तिला मार्गदर्शन करणाऱ्या नूतन माध्यमिक विद्यालयातील शिक्षकांचीही महत्त्वाची भूमिका आहे. भविष्यात तिने याहीपेक्षा मोठे यश मिळवून आपल्या गावाचे शाळेचे नाव राज्यात झळकावे यासाठी मेहनत घ्यावी. या मुख्य बांबीसाठी ''पित्याचे छत्र हरपले तरी, अनेक विद्यार्थी जिद्दीने आणि प्रयत्नाने दहावी पास होतात. असे हे उदाहरण क्वचितच पाहायला मिळतात यश केवळ जिद्द आणि मेहनतीचे प्रतीक आहे. तिच्या यशामुळे सर्वच स्तरांतून तिचे कौतुक होत आहे. या सर्व बाबींकडे सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे आणि सर्व क्षेत्रातुन तिचे अभिनंदन होत आहे

# दहशतवादाला कोणताही धर्म नसतो: पहलगामची रक्तरंजित घटना आणि भारताची माणुसकी

२२ एप्रिल २०२५ रोजी पहलगाममध्ये झालेल्या भयावह दहशतवादी हल्ल्यात २६ निष्पाप लोकांचा मृत्यू झाला आणि २० हून अधिक जण जखमी झाले. ही केवळ अमानुष कृती नव्हती, तर मानवतेविरुद्ध केलेली घोर फसवणूक होती. हे कृत्य अशा दहशतवाद्यांनी केले होते, जे सैन्याच्या गणवेशात छुप्या स्वरूपात आले होते. त्यांनी पर्यटकांना लक्ष्य केलं आणि हत्या करण्यापूर्वी त्यांच्या धर्माची चौकशी केली.

ही क्रूरता केवळ राष्ट्रविरोधी नाही, तर इस्लामच्या मूलभूत मूल्यांविरुद्धही अत्यंत लज्जास्पद आहे – तो धर्म जो न्याय, शांतता आणि जीवनरक्षण यावर भर देतो. कुरआन स्पष्टपणे सांगतो:आणि अल्लाहच्या मार्गात लढा त्या लोकांशी जे तुमच्याशी लढतात, पण मर्यादा ओलांडू नका; कारण अल्लाह मर्यादा ओलांडणाऱ्यांना पसंत करत नाही. (कुरआन २:१९०)

निष्पाप लोकांची हत्या – मग ते हिंदू, ख्रिश्चन, मुस्लिम किंवा कोणत्याही धर्माचे असोत – इस्लाममध्ये याचा स्पष्टपणे निषेध करण्यात आला आहे. जे लोक राजकीय फायद्यासाठी किंवा विकृत विचारसरणीसाठी सामान्य लोकांचे प्राण घेतात, त्यांना इस्लाममध्ये कोणताही सन्मान नाही.

हे जाणून घेणं महत्त्वाचं आहे की भारतात १७२.२ दशलक्ष मुस्लिम राहतात, ज्यामुळे भारत हा जगातील सर्वात मोठा मुस्लिम अल्पसंख्याक समुदाय असलेला देश आहे. आम्ही मुस्लिम या मातीतलेच आहोत. आमचं अस्तित्व भारताच्या आत्म्याशी जोडलेलं आहे. देशभरातील भारतीय मुस्लिम दहशतवादाविरुद्ध ठामपणे उभे आहेत – बंधुता, एकता आणि देशभक्तीचा प्रचार करत आहेत.

पहलगाम हल्ल्यादरम्यान काश्मिरी मुस्लिमांनी दाखवलेली कृतिशील माणुसकी याचे ठोस उदाहरण आहे. जखमी पर्यटकांचे प्राण वाचवण्यासाठी अनेकांनी स्वतःचा जीव धोक्यात घातला. धर्म न पाहता फक्त माणुसकीच्या नात्याने मदतीसाठी पावलं उचलली. ही शौर्यगाथा दहशतवाद्यांच्या भ्याडतेला सडेतोड उत्तर आहे. स्थानिक मुस्लिम नागरिक रुग्णालयांमध्ये जखमींना घेऊन गेले, काहींनी रक्तदान केलं आणि त्यांचे प्राण वाचवले.

हे सर्व एकच गोष्ट अधोरेखित करतं: माणुसकीचा संदेश द्वेषावर मात करू शकतो.

काश्मीरचं हृदय शांततेसाठी धडधडतं. अनेक प्रतिष्ठित इस्लामी संघटनांनी या हल्ल्याचा निर्भीडपणे निषेध केला आहे. ऑल इंडिया इमाम ऑर्गनायझेशनचे प्रमुख इमाम उमर अहमद इलियासी यांनी देशभरातील ५.५ लाख मशिदींमध्ये दहशतवादाविरुद्ध प्रार्थना करण्याचं आवाहन केलं. त्यांनी यावर भर दिला की, निरपराध लोकांची हत्या करणाऱ्यांना भारतभूमीत दफन करू नये. जमीयत उलेमा-ए-हिंदचे मौलाना अरशद मदनी यांनी दहशतवाद्यांना इस्लामचा शत्रू ठरवलं, तर जमाअत-ए-इस्लामीचे सय्यद सादत हुसैनी यांनीही या अमानवी कृत्याचा तीव्र निषेध केला.माणुसकीचं हे ठाम घोषणापत्र आहे – भारतात दहशतवादाला कोणतीही जागा नाही.

# बीडमध्ये जालना रोडलगत होणार सुसज्ज सहकार संकुल

**पालकमंत्री अजित पवारांकडून हिरवा कंदिल, आ.विजयसिंह पंडित यांच्या प्रयत्नाला यश**

**बीड । दिव्य रिपोर्टर**

**बीड शहरातील जालना रोड परिसरात मुख्य रस्त्यालगत सहकार विभागाचा भुखंड मागील अनेक वर्षापासुन बांधकामाच्या प्रतिक्षेत आहे. या भुखंडावर सहकार विभागातील सर्व कार्यालयांसाठी एकत्रित प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करुन बीड शहराच्या वैभवात भर घालील अशी आकर्षक व देखणी वास्तु उभारावी अशी मागणी आ. विजयसिंह पंडित यांनी उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजितदादा पवार यांच्याकडे केली होती. ना. अजितदादा पवार यांनी सहकार संकुलाच्या बांधकामास हिरवा कंदिल दाखविला असुन प्रशासनाला या बाबतचे आदेश दिले आहेत. इमारत बांधकामाचा आराखडा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य वास्तु शास्त्रज्ञाकडुन तयार करण्याचे निर्देश प्रशासनाला मिळाले आहेत. पालकमंत्री म्हणुन बीड जिल्ह्यासाठी सहकार संकुलाची प्रशासकीय इमारत ना. अजितदादा पवार यांच्या माध्यमातुन आणि आ. विजयसिंह पंडित यांच्या प्रयत्नातुन मिळणार आहे.**





बीड शहरातील जालना रोड परिसरात मुख्य रस्त्यालगत सर्व्हे नंबर १७९९ मध्ये सहकार आयुक्त यांच्या नावाने १५१५.९४ चौरस मिटर आकारमानाचा भुखंड आहे. या शासकीय भुखंडावर सहकार विभागातील प्रशासकीय कार्यालयांसाठी सहकार संकुलाच्या इमारतीचे बांधकाम प्रस्तावित होते. शहरातील काही व्यापाऱ्यांनी खाजगी प्रयोजनासाठी या जागेची मागणी शासनाकडे केली होती. आ. विजयसिंह पंडित यांनी या जागेवर सहकार विभागातील प्रशासकीय कार्यालयांसाठी सहकार संकुलाचे बांधकाम व्हावे यासाठी पाठपुरावा व प्रयत्न केले. ना. अजितदादा पवार यांच्या पालकमंत्री पदाच्या कार्यकाळात बीड शहराच्या वैभवात भर पाडेल अशी आकर्षक वास्तु निर्माण करण्यासाठी आ. विजयसिंह पंडित यांनी ना. अजितदादा पवार यांना साकडे घातले. आ. विजयसिंह पंडित यांच्या मागणीला त्यांनी हिरवा कंदिल दाखवत सहकार संकुलाच्या बांधकामास मान्यता दिली आहे. जिल्हा उपनिबंधक, सहाय्यक निबंधक, देखरेख संघ यासह सहकार विभागातील लेखा परिक्षण विभागाची कार्यालये आणि सहकार विभागाशी संबंधित प्रशिक्षण व मार्गदर्शन केंद्र सहकार संकुलात समाविष्ट करुन ही सर्व कार्यालये एका छताखाली आणुन सहकार विभागाची मुख्य प्रशासकीय इमारत बांधण्याचा मार्ग या माध्यमातुन मोकळा झाला आहे. पालकमंत्री म्हणुन ना. अजितदादा पवार यांच्या कार्यकाळात बीड शहराच्या वैभवात भर घालणारी शासकीय वास्तु जिल्हायाच्या ठिकाणी उभारत असल्याचे समाधान आ. विजयसिंह पंडित यांनी व्यक्त केले आहे.

# महाराष्ट्रामधून बीडच्या जिव्हाळा बेघर निवारा केंद्राची उत्कृष्ट निवारा केंद्र म्हणून निवड

**बीड । दिव्य रिपोर्टर**

सर्वोच्च न्यायालया च्या आदेशाने चालू असलेले नागरी बेघर निवारा या घटकांसाठी राज्यनिहाय निवारा सह नियंत्रण समिती गटित करण्याचे निर्देश दिले होते. त्या अनुषंगाने नागरी बेघर निवारा या घटकांच्या प्रगतीचे सनियंत्रण करण्यासाठी दि.०५ जून २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये माननीय उज्वल उके(से.नि.भा.प्र.से.) यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय निवारा चा नियंत्रण समिती गठीत करण्यात आलेली आहे राज्यस्तरीय निवारा सनियंत्रण समितीच्या रयत संस्थेद्वारे निवार्याचे निरीक्षण करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार त्रिशरण एनलायनमेंट फाउंडेशन या संस्थेने निवारा केंद्राचे निरीक्षण करून अहवाल सादर केलेला आहे. सदर अहवालामध्ये सर्वात उत्कृष्ट पाच निवारा गृहांची निवड केलेली आहे. त्यामध्ये सावली बेघर निवारा केंद्र, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, ग्रेस बेघर निवारा केंद्र बृहन्मुंबई महानगरपालिका, शहरी बेघर निवारा केंद्र अंबरनाथ नगर परिषद, संत




गाडगेबाबा बेघर निवारा अकोला, अकोला महानगरपालिका तर मराठवाड्यातील एकमेव बीड शहरातील जिव्हाळा बेघर निवारा केंद्राची महाराष्ट्रातील या पाच बेघर निवारा केंद्रा सोबत निवड झाली असून ही बीड शहरातील जिव्हाळा बेघर निवारा केंद्राची कार्याची दखल शासनाच्या समितीने घेऊन शहराचा सन्मान वाढवण्याची भावना व्यक्त होत आहे. मराठवाड्यातील एकमेव बीड शहरातील जिव्हाळा बेघर निवारा केंद्राची निवड झाल्याबद्दल बीड नगर पालिकेच्या मुख्याधिकारी श्रीमती निता अंधारे यांनी जिव्हाळा बेघर निवारा केंद्राच्या माध्यमातून आरोग्य, स्वच्छता, स्वावलंबन, शिस्त आणली सांस्कृतिक ठेवा जोपासत रंजल्या गांजलेल्या समाजातील विविध घटकांची मनोभावे सेवा होत असल्याचे मनोगत व्यक्त करुन जिव्हाळा बेघर निवारा केंद्राच्या व्यवस्थापनाचे कौतुक केले आहे.

मा. राज्यसह नियंत्रण समिती मार्फत महाराष्ट्र मध्ये पाच सर्वोत्कृष्ट बेघर निवारा यांची निवड झालेली आहे यामध्ये पिंपरी चिंचवड, बीड, अकोला, अंबरनाथ, बृहन्मुंबई येथील निवारा केंद्रांची निवड झाली. जिव्हाळा केंद्रास अमोल बडगुजर, शहर अभियान व्यवस्थापक चंद्रकांत तोडकर, शहर अभियान व्यवस्थापक, राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान, (पोलीस खात्यामध्ये पोलीस उपनिरीक्षक पदावर कार्यरत असलेले, राष्ट्रपती पुरस्कार विजेते राजूभाऊ गुळभिले यांच्या पुढाकाराने निवारा केंद्रामध्ये शहरातील दानशूर व्यक्तींच्या मदतीने सर्वात मोठा अन्नदानाचा प्रश्न बऱ्याच अंशी मार्गी लागला. यामध्ये गुळभिले सरांचे मोलाचे सहकार्य लाभले असल्याचे प्रतिपादन जिव्हाळा बेघर निवारा केंद्राचे व्यवस्थापक राजू वंजारे, संचालक अभिजित वैद्य, यश वंजारे, काळजीवाहक छाया सरोदे यांनी यावेळी सांगितले असून जिव्हाळा बेघर निवारा केंद्राच्या कार्याची दखल राज्य सरकारने घेतल्याबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवरांनी जिव्हाळा परिवारावर शुभेच्छांचा वर्षाव करून पुढील काळासाठी तनमनधनाने सहकार्य करण्याचे आश्वासन दिले आहे.

# धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादीचे सदस्य नोंदणी अभियान जोमात

## रविवारी घाटनांदूर येथे होणाऱ्या सदस्य नोंदणीस उपस्थित रहा-देशमुख, शिरसाट,

**परळी । दिव्य रिपोर्टर**

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते तथा माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली परळी विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सदस्य नोंदणी अभियान जोमात सुरू असून उद्या रविवारी सकाळी नऊ वाजल्यापासून घाटनांदुर येथे सदस्य नोंदणी अभियान संपन्न होणार आहे.**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सदस्य नोंदणीचे जिल्हा परिषद गटनिहाय नियोजन करण्यात आले असून, घाटनांदुर येथील सदस्य नोंदणी अभियानाचे उद्घाटन माजी आमदार संजय भाऊ दौंड तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर आबा चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. या बियाण्यात सर्व पदाधिकारी कार्यकर्ते तसेच विविध आघाड्यांच्या पदाधिकाऱ्यांनी



सहभागी होऊन जास्तीत जास्त नागरिकांचे सदस्यत्व पक्षात नोंदवून घ्यावे असे आवाहन परळी विधानसभेचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष गोविंदराव देशमुख अंबाजोगाईचे तालुकाध्यक्ष राजेभाऊ अवताडे तसेच जिल्हा सरचिटणीस शिवाजीराव शिरसाठ यांनी केले आहे. या अभियानास युवक नेते अजय मुंडे, ज्येष्ठ नेते दत्ता पाटील, पांडू तात्या हारे, रंजीत चाचा लोमटे, अजितदादा गरड, जयवंतराव देशमुख, ज्ञानेश्वर बप्पा जाधव, बळवंतराव बावणे, सचिन अपेट, डॉक्टर अजितदादा देशमुख, बाळासाहेब देशमुख, मेहबूब शेख, सुंदरराव साळुंखे, बालासाहेब शेप, शरद बावणे, सुधीर चाटे, बाबुराव जगताप सर, वसंतराव देशमुख, विश्वंभर फड, बंडू गीते, बापूसाहेब गीते, माऊली गरजे, हनुमंतराव गायकवाड, नाथराव घुले, महादेव निळे, अर्जुन जाधव, नामदेव घुले, राखीताई अंधारे, आतार जागीरदार, गणेश देशमुख, शोभाताई कदम, भास्कर गोडबोले, महादेव सोनपीर, रामराव शिरसाट, अरुण नागरगोजे, शिवाजी चव्हाण, बळीराम घोंगडे, वामन बापू जाधव, दादा वैद्य, सुरेश मिसाळ सर, श्रीकृष्ण गीते, मच्छिंद्र वालेकर, बालासाहेब राजमाने, उत्तमराव जाधव, श्रीमंत शिंदे यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

# 'मेडिकयेर'कडून उच्च रक्तदाबनिमित्त जनजागृती रॅली

## आरोग्याच्या मूलमंत्राने बीड शहर दणाणले

**बीड । दिव्य रिपोर्टर**

**जागतिक उच्च रक्तदाब दिन (१७ मे) निमित्त बीडमध्ये मेडिकेयर हॉस्पिटलच्या वतीने आरोग्य जागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. डॉ.सुनील बोबडे डॉ.अजित घोडके, डॉ. उमेश घायतिडक, डॉ. सुरेश पिंपळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही रॅली पार पडली, ज्यामध्ये रुग्णांच्या काळजीचे महत्त्व, रक्तदाब नियंत्रणाचे उपाय आणि नियमित तपासणीची गरज यावर भर देण्यात आला. या रॅलीत आरोग्याच्या जनजागृतीचे फलक विद्यार्थ्यांनीनी झळकावले होते.**

जागतिक उच्च रक्तदाब दिनानिमित्त बीड शहरामध्ये (दि.१७) मे शनिवार रोजी या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते, या रॅलीमध्ये डॉ. सुनील बोबडे, डॉ. अजित घोडके, डॉ. उमेश घायतिडक, डॉ. सुरेश पिंपळे




यांसह अनेक आरोग्यकर्मी आणि नागरिक उपस्थित होते. यावेळी बीडकरांनी मोठ्या प्रमाणात उत्साहाने सहभाग घेतला आणि उच्च रक्तदाबावर नियंत्रण ठेवण्यासाठी नियमित तपासणी, संतुलित आहार आणि व्यायामाचे महत्त्व यावर भर देण्यात आला. आज च्या धाकाधकीच्या जीवनात माणसांना आरोग्याकडे लक्ष देणे शक्य नसल्यामुळे अनेक आजरांना सामोरे जावे लागत आहे. कमी वयात अगदी तरुणपणात आरोग्याकडे दुर्लक्ष झाल्याने अनेकांना जीव ही गमवावा लागतो, त्यामुळे आरोग्य ठीक तर आयुष्य ठीक असल्याचे सांगत मेडिकेयने ही जन जागृती रॅली आयोजित केली होती. या रॅलीत बीडकरांना आरोग्याचा कानमंत्र देण्यात आला.

# लोकनेते विनायकराव मेटे साहेबांचे सजग समाज निर्मितीचे स्वप्न पूर्ण करायचे आहे - डॉ.ज्योती मेटे

## शिवसंग्राममध्ये असंख्य युवकांचा जाहीर प्रवेश, विद्यार्थी आघाडीची कार्यकारणी जाहीर

बीड । दिव्य रिपोर्टर

लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांच्या विचारांनी प्रेरित होऊन आज शिवसंग्राम भवन येथे शिवसंग्राम अध्यक्ष डॉ ज्योती विनायकराव मेटे यांच्या प्रमुख उपस्थितीत शहरातील असंख्य युवकांनी शिवसंग्राम मध्ये जाहीर प्रवेश केला असून येणाऱ्या काळात शिवसंग्रामच्या माध्यमातून युवक,तरुण ,विद्यार्थी आणि बेरोजगार यांच्यासाठी लढा देण्याचे आणि त्यांच्या समस्या सोडवण्याचा निर्धार यावेळी युवकांनी केला या प्रसंगी शिवसंग्राम अध्यक्ष डॉ ज्योती विनायकराव मेटे, शिवसंग्रामचे जिल्हा सरचिटणीस अनिल घुमरे पाटील, शहराध्यक्ष सुहास पाटील, उपाध्यक्ष रामदास नाईकवाडे,धर्मराज मागदे सर , मनोज जाधव, विद्यार्थी आघाडीचे कार्याध्यक्ष ओंकार पाटील, अशोक लोकरे, शेषेराव तांबे, कैलास शेजाळ आदी. उपस्थित होते.

डॉ. ज्योती मेटे यांच्या उपस्थितीत आज



असंख्य युवकांनी शिवसंग्राम मध्ये जाहीर प्रवेश केला यावेळी मंचावर शिवसंग्राम चे विविध पदाधिकारी उपस्थित होते. हा पक्षप्रवेश शिवसंग्राम विद्यार्थी आघाडीचे कार्याध्यक्ष ओंकार पाटील यांच्या नेतृत्वात करण्यात आला असून यावेळी लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांनी त्यांच्या हयातीमध्ये युवक, तरुण, विद्यार्थी आणि बेरोजगार यांच्यासाठी केलेले कार्याला उजाळा देताना डॉ. ज्योती मेटे म्हणाल्या की, मेटे साहेबांनी त्यांच्या हयातीमध्ये अनेक तरुणांना रोजगार मेळाव्यांचे आयोजन करून त्यांच्या हाताला काम दिले त्याचबरोबर पोलीस भरतीची वयोमर्यादा वाढवण्याचे काम केले, एमपीएससीच्या विद्यार्थ्यांना दर रविवारी पुणे येथे मोफत जेवणाची व्यवस्था केली आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे सजग समाज निर्मितीसाठी तरुणांनी व्यसनांपासून दूर राहावे यासाठी व्यसनमुक्तीचा लढा उभा केला

# बालवयातच ईश्वरी लोहोटेची सांस्कृतिक क्षेत्रात उंच भरारी, कला भूषण पुरस्काराने सन्मानित




मुंबई । दिव्य रिपोर्टर

बालवयातच कलात्मक धोरण अवलंबुन नृत्य,सामाजिक बांधिलकी,गायन तसेच सांस्कृतिक क्षेत्रात आपले नाव उज्वल करणारी मुलगी म्हणजे ईश्वरी लोहोटे. कलागुण संपन्न,गोड गळ्याची गायिका,सामाजिक क्षेत्रात अग्रेसर, नृत्य, शिक्षणात हुशार विविध क्षेत्रात आपल्या गुरुजनांचे व आईवडीलांचे नाव अजरामर करणारी इयत्ता सातवी मध्ये शिकणारी मुलगी ईश्वरी लोहोटे. तीच्या या चतुरस्त्र कामगिरीची दखल मुंबईच्या आर्यारवी एंटरटेन्टमेन्ट या संस्थेने घेतली. नुकताच शिशुविकास हॉल,राजकमल स्टुडिओ,परेल येथे आर्यारवी एंटरटेन्टमेन्टने आयोजित केलेल्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय लघुपट महोत्सव व पुरस्कार वितरण सोहळ्यात ईश्वर लोहोटे हिलाकला भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार प्रसिद्ध सिने-नाट्य अभिनेते जयराज नायर, प्रसिद्ध सिने नाट्य अभिनेते, दिग्दर्शक प्रदीप कबरे, जनजागृती सेवा संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर, समाजसेविका सीमाताई पाटील, ग्राफीक डिझायनर मनिष व्हटकर आदी मान्यवरांच्या उपस्थितीत समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला.ईश्वरी लोहोटे हिने गायन क्षेत्रातील विविध टप्यातील परीक्षा देऊन प्राविण्य मिळविलेले आहे.नाट्य,सामाजिक क्षेत्र, नृत्य, गायन, शिक्षण या क्षेत्रात उत्तम कार्य केल्याबद्दल विविध क्षेत्रातील सामाजिक संस्थांचे पुरस्कार, सन्मानपत्र, प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे.तसेच प्रसिद्ध सिने-नाट्य, लेखक-दिग्दर्शक वामन केंद्रे यांच्या कार्यशाळेत शिक्षण घेत आहे.ईश्वरी लोहोटे हिलाकला भूषणपुरस्कार मिळाल्याबद्दल तीचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.

# परळीतील मारहाण प्रकरणाला जातीय रंग देऊ नका -पोलीस अधीक्षक नवनीत काँवत

बीड । दिव्य रिपोर्टर

परळी येथे शुक्रवारी संध्याकाळी एका तरुणाला बेदम मारहाण करण्यात आली होती. शिवराज दिवटे असे या तरुणाचे नाव आहे. एका टोळक्याने त्याचे अपहरण करुन त्याला डोंगराच्या भागात नेले आणि बांबू आणि लाकडाने बेदम मारहाण केली होती. या घटनेमुळे बीड जिल्ह्यात एकच खळबळ माजली होती. मारहाण झाल्यानंतर शिवराज दिवटे गंभीर जखमी झाला होता. त्याला तात्काळा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. या सगळ्या प्रकारानंतर शनिवारी शिवराज दिवटे याने संवाद साधला. यावेळी त्याने आपल्याला लोखंडी रॉड आणि कत्तीने मारहाण झाल्याचे सांगितले.

## जातीय रंग देऊ नका: नवनीत काँवत



**परळी तालुक्यातील टोकवाडी परिसरात झालेली मारहाण ही तत्कालिक कारणातून झाली आहे. या प्रकरणाला कुठलाही जातीय रंग देण्याचा प्रयत्न कोणीही करू नये, असे आवाहन बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी केले आहे. या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला असून सात आरोपींना अटक करण्यात आले असून दोन आरोपी अल्पवयीन असल्याची माहिती पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी दिली.**

तसेच टोळक्यातील काहीजण, 'याचा संतोष देशमुख पार्ट-२ करायचा ', असे म्हणत असल्याचेही शिवराजने सांगितले.

मी जलालपूर येथे सप्ताहाच्या जेवणासाठी गेलो होतो, जेवणानंतर तिथे काही भांडण लागले होते तिथे मी भांडण पाहायला उभा होतो. त्यानंतर शिवाजीनगरला मी मित्राला सोडून रिलायन्स पेट्रोल पंपाकडे जात होतो, हे मारणाऱ्यांना माहिती होते.पेट्रोल पंपाजवळ तर पाच गाड्यावरील पोरांनी रस्ता रोखत मला मारहाण केली व मला रत्नेश्वर डोंगरावर घेऊन गेले. मला मारहाण करताना ते बोलत होते की, 'याला सोडायचे नाही, याचा संतोष देशमुख पार्ट-२ करायचा'. ते मला मारून टाकत होते. त्यामुळे त्यांना फाशीची शिक्षा दिली पाहिजे.

दोन माणसांनी जर मला मारताना बघितलं नसतं तर मी जिवंत राहत नव्हतो. लोखंडाची रॉड, कत्ती,लाकूड यांनी मला मारहाण केली. माझ्या डोक्यात बाटली देखील मारण्यात आली, पण ती फुटली नाही. सर्व आरोपी गांजा प्यायले होते, असे शिवराज दिवटे याने सांगितले.

# बरसत्या पावसात महिला मंडळ अधिकाऱ्यांनी रस्ता केला मोकळा

## जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचे लोकाभिमुख प्रशासन : तहसीलदार शेळके यांचेकडून माणुसकीचे दर्शन

**बीड । दिव्य रिपोर्टर**

**सध्या राज्यात छत्रपती शिवाजी महाराज समाधान योजना राबविणे सुरु आहे . महसुलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे शेतकऱ्यांच्या हिताचे अनेक निर्णय घेत आहेत . छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्यामार्फत सस्ती अदालत राबविण्यात येत आहे . पूर्ण विभागात शिबीरे आयोजित करण्यात आली असून , ही शिबिरे ग्रामीण भागातील नागरिकांच्या अडचणी तातडीने सोडवण्यासाठी उपयुक्त ठरत आहेत.**

बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी , उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासनाने प्रभावी कामगिरी करत नागरिकांची तातडीने मदत करण्याचा चंग बांधला आहे .

बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचा शेतकऱ्यांचे रस्ते खुले करण्यावर खूप भर असतो . म्हाळसापूर येथील शेतकऱ्यांसाठी तहसीलदारांनी तातडीने निर्णय घेत मंडळ अधिकारी वंदना विघ्ने व तलाठी विलास शिंदे यांना रस्ता खुला करण्याचे निर्देश दिले . त्यांनीही गुरुवार १५ मे रोजी भर पावसात तातडीने कारवाई करत अनेक दिवसांपासून बंद असलेला शेत रस्ता खुला केला . सुंदर हरिबा धापसे , पांडुरंग सुंदर धापसे यांना गेली







चार वर्ष शेतात जाण्यासाठी रस्ता नव्हता . मंडळ अधिकारी वंदना विघ्ने यांनी अंगद बाबासाहेब खांडे व इतर यांना विश्वासात घेत बांधावरील रस्ता खुला केला . यावेळी पोलीस प्रशासनातर्फे हवालदार मनिषा केदार , श्री धोंडे उपस्थित होते . या रस्त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीसाठी जाणे सुलभ झाले असून त्यांच्या दैनंदिन कामांमध्ये मोठा दिलासा मिळाला आहे . पावसामुळे रस्ता बंद झाल्याने शेतकऱ्यांना शेतीच्या कामासाठी मोठी अडचण निर्माण झाली होती . मात्र , स्थानिक प्रशासनाने दाखवलेली तत्परता व संवेदनशीलता यामुळे नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे .

शुक्रवारी अशाच प्रकारे पारगाव शिरस येथे पारगाव शिरस व शहाबाजपूर गावचा सुमारे दीड किलोमीटर शिवरस्ता मोकळा करण्यात आला . हा अडवलेला शिवरस्ता सामोपचाराने खुला करून देताना मंडळाधिकारी स्मिता गुंजाळ शेळके , ग्राम महसूल अधिकारी विजय बहिर सरपंच दिनकर जमदाडे यांनी कौशल्य पणाला लावले . हा रस्ता सुमारे ६० शेतकऱ्यांना उपयोगी पडणार आहे . यावेळी रामकिसन वाटमोडे , मगन कणसे , अरूण कणसे , बळीराम शेंडगे , विश्वम्बर कणसे , राजाभाऊ कणसे , देवीदास उबाळे , विठ्ठल कणसे , त्रिंबक रसाळ , जालींदर कणसे , लहू कणसे , नारायण कणसे , बबन टेकवले , सूदाम कणसे , तिर्थराज रसाळ , रामभाऊ रसाळ , बाळू कणसे , गंगाराम रसाळ उपस्थित होते .

असाच एक रस्ता बेलुरा येथे शुक्रवारी मोकळा करण्यात आला . येथील गट नंबर १३५ व ११८ गाडी रस्त्याच्या तक्रार अर्जानुसार अर्जदार देवजी गवते विरुद्ध गैरअर्जदार श्रीमंत साहेबराव गवते यांचा पानंद रस्ते खुला करण्यात आला . आपसात समेट घडवून आणून या ठिकाणचा रस्ता दोघांच्या संमतीने / तडजोडीने खुला करण्यात आला . या वेळी मंडळ अधिकारी प्रभू येवले , ग्राम महसूल अधिकारी उत्तरेश्वर खांडे व गावकरी उपस्थित होते .

तालुक्यात अशा प्रकारे रस्ते खुले होत असल्याने शेतकऱ्यांनी प्रशासनाचे आभार मानत हा उपक्रम गरजूंसाठी संजीवनी ठरत असल्याचे सांगितले . मागील सहा महिन्यात सुमारे ५० किलोमीटर रस्ते मोकळे झाल्याचे नायब तहसीलदार सुहास हजारे यांनी सांगितले .जनतेमध्ये प्रशासनाविषयी विश्वास वाढत असून हा उपक्रम इतर ठिकाणीही राबवावा , अशी मागणी होत आहे . पावसामुळे रस्ते बंद झाल्याने शेतकऱ्यांना शेतीच्या कामासाठी मोठी अडचण निर्माण झाली होती . मात्र , स्थानिक प्रशासनाने दाखवलेली तत्परता व संवेदनशीलता यामुळे नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे . तालुक्यातील शेतकऱ्यांनी प्रशासनाचे आभार मानत हा उपक्रम गरजूंसाठी संजीवनी ठरत असल्याचे सांगितले . या कार्यवाहीमुळे जनतेमध्ये प्रशासनाविषयी विश्वास वाढत असून हा उपक्रम इतर ठिकाणीही राबवावा , अशी मागणी होत आहे .

# ऑन दि स्पॉट पंचनामा की षडयंत्र !

**एकाच गावाची, एकाच नेत्याची दोन वेळा चौकशी**





**जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक व जिल्हा परिषद सीईओ यांनी या गंभीर प्रश्नाची दखल घेण्याची गरज**

दिव्य आधार

सोमवार, दि. १९ मे २०२५ (पान-४)

## एखाद्या नेत्याचे, गुत्तेदाराचे भविष्य उद्ध्वस्त करण्याचा कुटील डाव असल्याचा संशय



ग्राऊंड रिपोर्टर
दिव्य आधार
शेख रिजवान
9561840184

**सार्वजनिक बांधकाम विभागानेही नाळवंडी येथील कामे रोखली, वर्कऑर्डर दिले मार्कआउट टाकण्यास टाळाटाळ**

**बीड तालुक्यातील नाळवंडी येथे नरेगा अंतर्गत सात विविध रस्त्याची कामे मंजूर होती, सदरील कामे नाळवंडीचे सरपंच राजेंद्र राऊत यांनी करून घेतली होती, सदरील कामे बोगस झाल्याची तक्रार आ.क्षीरसागर यांनी केली त्यानंतर या कामाची चौकशी झाली**

**या कामाची पहिली चौकशी मार्च-२०२५ मध्ये करण्यात आली, ही चौकशी पंचायत समितीतील अधिकारी-कर्मचारी यांनी केली, चौकशीत कामे योग्यरित्या झाल्याचा अहवाल चौकशी समितीने दिला**
















पहिल्या छायाचित्रात मार्च २०२५ या महिन्यात चौकशी समितीने ऑन दि स्पॉट जावून रस्त्याची पाहणी केलेली तसेच त्या रस्त्याच्या कामात वापरण्यात आलेल्या खडीचा पंचनामा केलेला दिसत आहे. दुसऱ्या छायाचित्रात एप्रिल २०२५ या महिन्यात गेवराईच्या पथकाने त्या रस्त्याचा फेर पंचनामा करून तपासणी केल्याचे दिसून येते. तर तिसऱ्या छायाचित्रात रस्त्याची कामे करताना मजूर दिसतात. चौथ्या व पाचव्या छायाचित्रात रस्त्याची कामे त्यावेळी कशी दर्जेदार झाली होती यातून स्पष्ट दिसून येते.

**शहराअंतर्गत असलेल्या काही रस्त्याची भयान अवस्था, शहरातील काही रस्त्याची कामे बोगस झालेली, काही रस्त्याची कामे कागदोपत्री झालेली, एकाच रस्त्यावर डबल बिले उचललेली, अशा अनेक तक्रारी तर मग आ.क्षीरसागरांनी शहरात ऑन दि स्पॉट पंचनामा का केला नाही? दिव्य आधारने दि.१२ मे च्या अंकात एमआरईजीएस अंतर्गत मजूरांच्या बोगस स्वाक्षरी प्रकरण उघडकीस आणले, त्याचे सर्व पुरावे उपलब्ध, आ.क्षीरसागरांनी या पुराव्याच्या आधारावर कारवाईसाठी पाठपुरावा करण्याची गरज**

बीड :

बीड तालुक्यात एकूण १७५ ग्रामपंचायत आहेत. या सर्व ग्रामपंचायतीत नरेगातून विविध रस्त्याची कामे झालेली असावीत, अनेक ग्रामपंचायतीत नरेगातून झालेली कामे दर्जाहिन झाल्याच्या अनेकवेळा वृत्त प्रकाशित झालेले आहेत. तसेच बोगस कामाच्या तक्रारीही झालेल्या असाव्यात परंतु वारंवार नाळवंडी गावात झालेल्या त्या सात रस्त्यांची सतत चौकशी होत असल्याने नाळवंडी गावाला मुद्दाम टार्गेट केले जात आहे असे यातून दिसून येत आहे. विशेष म्हणजे स्वत: आ.क्षीरसागर या प्रकरणी तक्रार देवून चौकशीची मागणी करतात, चौकशी अहवाल आल्यानंतर तसेच त्या रस्त्याच्या कामाची ७५ टक्के बिले अदा झाल्यानंतर स्वत: ऑन दि स्पॉट पंचनामा करतात, यातून काय सिद्ध होणार हे नाळवंडी गावच नव्हे तर जिल्ह्यातील नागरिकांना कळू लागले आहे. हे ऑन दि स्पॉट पंचनामा आहे की, नाळवंडी गावचे सरपंच राजेंद्र राऊत यांच्या विरोधात षडयंत्र आहे अशीही चर्चा मतदारसंघात सुरू झाली आहे. विशेष म्हणजे या सात रस्त्याच्या कामाच्या दोन-दोन चौकशी झाली. एवढेच नव्हे तर क्रॉसचौकशी करण्यासाठी गेवराईतील अधिकाऱ्यांना चौकशीची जबाबदारी देण्यात आली होती, दोन्ही चौकशीत काम योग्यरित्या झाल्याचा अहवाल आला. एवढेच नव्हे तर जिल्हा परिषद सीईओ यांनी स्वत: यादी पाठवून नाळवंडी गावात झालेल्या त्या सात रस्त्याच्या कामाची देयके अदा करण्यासाठी बीड पंचायत समितीला कळविले. त्यानंतर पुन्हा आ.क्षीरसागर स्वत: ऑन दि स्पॉट जावून त्याच कामाचा पंचनामा करतात. राजकीय दृष्टीकोनातून पाहिले तर एकाच गावाला टार्गेट करणे किंवा एकाच गावाची दोन-तीन वेळा चौकशी करणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. भविष्यात याचे विपरित परिणाम येण्याची शक्यता नाकारता येणार नाही, यासाठी जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक व जिल्हा परिषद सीईओ यांनी या ऑन दि स्पॉट पंचनाम्याकडे गांभीर्याने पाहून लक्ष देण्याची गरज आहे. नाळवंडी गावाला फक्त पंचायत समितीच नव्हे तर सार्वजनिक बांधकाम विभागातूनही टार्गेट करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे दिसून येत असून डिसेंबर २०२४ या महिन्यात नाळवंडी गावातील रस्त्याच्या कामाला सार्वजनिक बांधकाम विभागातून वर्कऑर्डर देण्यात आले होते. परंतु अद्यापपर्यंत तेथील अभियंता यांनी या कामाचे मार्कआऊट टाकून दिले नसल्याने त्या रस्त्याची कामे रखडली. एकंदरीत नाळवंडी गावाला विविध विभागातून प्रशासकीय स्तरावर टार्गेट केले जात असल्याचे चित्र दिसून येत असून काही प्रशासकीय अधिकारी राजकीय दबावात गुत्तेदार, राजकीय नेते यांचे भविष्य उद्ध्वस्त करत असल्याचा संशय निर्माण होत आहे. जर अशाप्रकारे नेत्यांना किंवा ग्रामस्थांना टार्गेट केले जात असेल तर भविष्यात याचे परिणाम सर्वांनाच भोगावे लागतील. नाळवंडीचे सरपंच यांनी या प्रकरणी जिल्हाधिकारी यांना तक्रार देवून प्रशासकीय अधिकारी राजकीय दबावात कामे रोखून धरत असल्याचे प्रशासनाला कळविले असून जिल्हाधिकारी यांनी याप्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकाऱ्यांना जवाब विचारण्याची गरज आहे.

तब्बल दिड वर्षांपूर्वी नाळवंडी गावात नरेगाअंतर्गत सात कामांना मंजूरी मिळाली होती. यात रावसाहेब वाघमारे यांचे शेत ते गवळी यांच्या शेतापर्यंत खडीकरण करणे, लक्ष्मण काळे यांचे शेत ते राजू कोरडे यांच्या शेतापर्यंत खडीकरण करणे, अर्जून नन्नवरे यांचे शेत ते बाबासाहेब काळे यांच्या शेतापर्यंत खडीकरण करणे, दलित वस्ती स्मशानभूमी ते त्र्यंबक राऊत यांच्या शेतापर्यंत खडीकरण करणे, गणेश गायके यांचे शेत ते पंजाब सोनवणे यांच्या शेतापर्यंत खडीकरण करणे, बाबासाहेब तंबरे यांच्या शेतापासून ते रामेश्वर वाघमारे यांच्या शेतापर्यंत खडीकरण करणे, संगमेश्वर ते भक्तीदास नन्नवरे यांच्या शेतापर्यंत खडीकरण करणे अशाप्रकारे ही सात कामे नाळवंडीचे सरपंच राजेंद्र राऊत यांना मिळाली होती. त्यांनी ही कामे करून देयके सादर केली. देयके मिळण्यापूर्वी या सात कामांची आमदार क्षीरसागर यांनी तक्रार करून चौकशीची मागणी केली. त्यानंतर बीड पंचायत समितीने चौकशी समिती स्थापन करून मार्च २०२५ या महिन्यात या सात कामांची चौकशी केली. चौकशीत थोड्याफार त्रुटी वगळता ही कामे योग्यरित्या झाल्याचा चौकशी समितीने अहवाल दिला. परंतु या चौकशीत समाधानी नसल्याने या कामाची क्रॉसचेकींग करण्यासाठी दुसरी चौकशी समिती स्थापन करण्यात आली. यात गेवराई पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांना या क्रॉस चौकशीची जबाबदारी सोपविण्यात आली. गेवराईच्या अधिकाऱ्यांनी पारदर्शक चौकशी करून अहवाल दिला, या अहवालात ही कामे योग्यरित्या झाल्याचे त्यांनी सांगितले. दोन चौकशी झाल्यानंतर जिल्हा परिषद सीईओ यांनी या सात कामांच्या देयके देण्याचे आदेश बीड पंचायत समितीला दिले. त्याअनुषंगाने बीड पंचायत समितीने या सात कामाची ७५ टक्के बिले संबंधितांना दिली. उर्वरित २५ टक्के बिले लवकरच मिळणार होती, त्या दरम्यान पुन्हा आमदारांनी ऑन दि स्पॉट म्हणून नाळवंडी गावातील त्या सात रस्त्याची पाहणी केली. हे सात रस्ते तब्बल दिड वर्षापूर्वी तयार करण्यात आलेले, दरम्यान दोन वेळा अतिवृष्टीही झाली. अतिवृष्टी झाल्यानंतरही त्या कामाचा दर्जा टिकून राहिला. दिड वर्षांपूर्वी केलेली कामे थोडेफार तरी खराब होणारच परंतु दर्जेदार कामे असल्याने ते रस्ते आजही टिकून आहेत. वारंवार नाळवंडी गावात झालेल्या रस्त्याची सतत चौकशी लावणे नंतर पुन्हा ऑन दि स्पॉट पंचनामा करणे याशिवाय सार्वजनिक बांधकाम विभागातून दुसऱ्या रस्त्याचे वर्कऑर्डर दिल्यानंतर मार्कआउट टाकून न देणे हा एकाप्रकारे नाळवंडी गावातील ग्रामस्थांचा छळ होत असल्याचे म्हणावे लागेल.या दृष्टीकोनातून या गंभीर प्रश्नाकडे प्रशासनानेही लक्ष देण्याची गरज असून वारंवार एकाच गावाची एकाच कामाची दोन-दोन चौकशी करून बिले रोखण्याचा हा डाव आहे का? याचाही प्रशासनाने शोध घेण्याची गरज आहे.

## आमदारांनी शहरातील रस्त्याचा ऑन दि स्पॉट पंचनामा करावा

बीड तालुक्यात एकूण १७५ ग्रामपंचायती आहेत. नियमाने बोगस कामे झाली असतील तर त्या बोगस कामाकडे आमदाराने लक्ष देणे गरजेचे आहे. परंतु फक्त नाळवंडी गावातील कामाकडेच बारकाईने लक्ष देणे कितपत योग्य आहे. आ.क्षीरसागरांना शहरातून मोठ्या प्रमाणात विधानसभेत लीड मिळालेली आहे. त्यामुळे आमदार क्षीरसागरांनी शहराकडेही जास्त लक्ष देणे गरजेचे वाटते. शहरातील गल्लीबोळात रस्त्याची भयान अवस्था झालेली आहे. चांदणी चौक ते जुना बाजार मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौक या रस्त्यातून चालणेही शक्य नाही. शहराअंतर्गत असे अनेक रस्ते ज्यामुळे ज्येष्ठ नागरिकांना पाठीचा त्रास होत आहे. आमदारांनी अधूनमधून शहरातील रस्त्याचा ऑन दि स्पॉट पंचनामा करावा. जेणेकरून नागरिकांना दिलासा मिळेल. परंतु आमदारांचे लक्ष फक्त नाळवंडीकडेच का? असाही प्रश्न आता नागरिकांना पडलेला आहे.

## त्या बोगस मस्टरची आमदार चौकशी लावणार का?

तब्बल २५ दिवसांपूर्वी बीड पंचायत समितीत एक ग्रामरोजगार सहाय्यक मजूरांच्या स्वाक्षऱ्या स्वत: करत होता. ही बाब दिव्य आधारने चित्रीकरण केली. याचे व्हिडिओही तयार आहे, ज्याअर्थी ग्रामरोजगार सहाय्यक मजूरांच्या बोगस स्वाक्षऱ्या करत होता त्या दृष्टीकोनातून पाहिले तर कदाचित मजूरही बोगस असावेत. दिव्य आधारने १२ मे च्या अंकात हे वृत्त प्रकाशित केले. आमदाराचे पीए व स्वत: आमदार यांच्या व्हॉटस्ॲपवरून हे वृत्त पाठवून या संदर्भात याचे सर्व पुरावे उपलब्ध असल्याचे त्यांना कळविले. आता आमदार क्षीरसागर त्या बोगस मस्टरची चौकशी लावणार का? हा महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होत असून बीड तालुक्यात अनेक मस्टरवर मजूरांच्या बोगस सह्या असल्याचा संशय असून या दृष्टीकोनातून आमदार क्षीरसागरांनी १७५ ग्रामपंचायतीत झालेल्या सर्वच कामांचा आढावा घेवून मस्टरची उच्चस्तरीय चौकशी लावण्याची गरज आहे.



एमआरईजीएस लेबर स्कॅम

मजूरांच्या नावापुढे बोगस स्वाक्षरी करताना ग्रामरोजगार सहाय्यकाला दिव्य आधारच्या प्रतिनिधीने रंगेहात पकडले

अनेक मस्टरवर मजूरांच्या बोगस स्वाक्षरी करून बिले उचलल्याचा संशय, उच्चस्तरीय चौकशीची गरज

मस्टरवर जर बोगस स्वाक्षऱ्या आहेत तर मजूरही बोगस असल्याची शंका

सर्व पुरावे जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करणार

त्यानंतर पुन्हा एप्रिल २०२५ या महिन्यात या कामाची फेरचौकशी करण्यात आली, ही चौकशी गेवराई पंचायत समितीचे अधिकारी-कर्मचारी यांनी केली,त्या अधिकाऱ्यानेही चौकशी करून कामे योग्य झाल्याचा अहवाल दिला, अशाप्रकारे दोन महिन्यात दोन चौकशा करण्यात आल्या

त्यानंतर बीड पंचायत समितीला सहा कोटीचा निधी प्राप्त झाला, या निधीतून नाळवंडी येथे झालेल्या कामाची देयके अदा करावी म्हणून स्वत: सीईओ आदित्य जिवणे यांनी कामाची यादी पाठवून पंचायत समितीला कळविले, तब्बल दोन चौकशी झाल्यानंतर नाळवंडी येथे झालेल्या त्या सात रस्त्यांच्या कामाची ७५ टक्के देयके बीड पंचायत समितीने अदा केली, उर्वरित २५ टक्के निधी लवकरच मिळणार होते

त्यानंतर पुन्हा क्षीरसागर यांच्या वतीने या सात रस्त्याचा ऑन दि स्पॉट पंचनामा म्हणून झालेल्या कामाची पाहणी करण्यात आली, तब्बल दिड वर्षांपूर्वी झालेले रस्ते थोडेफार तरी खराब होणारच परंतु आजही रस्ते चांगले दिसून आले, हे दर्जेदार कामाचे उदाहरणच म्हणावे लागेल

**बीड तालुक्यात एकूण १७५ ग्रामपंचायती, एकंदरीत सर्वच ग्रामपंचायतीत नरेगाची कामे झालेली तर मग नाळवंडीच टार्गेट का? पंचायत समितीच नव्हे तर सार्वजनिक बांधकाम विभागातूनही नाळवंडी गावाला टार्गेट करण्याचा प्रयत्न**

**नाळवंडीचे सरपंच राजेंद्र राऊत यांनी सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकारी राजकीय दबावात असल्याचा केला आरोप, वर्कऑर्डर देवूनही मार्कआउट टाकून देत नसल्याने रस्त्याचे काम रखडल्याचे तक्रारी अर्जात नमूद, सरपंच राऊत यांनी दिला आत्मदहनाचा इशारा**

## सार्वजनिक बांधकाम विभागातील त्या अधिकाऱ्यांची चौकशी पालकमंत्र्यांनी करावी

डिसेंबर महिन्यात डीपीडीसी अंतर्गत नाळवंडी गावात दोन रस्त्याची कामे मंजूर करण्यात आली होती. यात मौज ते नाळवंडी अशाप्रकारे ही कामे असून या रस्त्याची भयान अवस्था झाल्याने ही कामे करणे गरजेचे असल्याने डीपीडीसीमधून या कामांना मंजूरी मिळाली होती. विशेष म्हणजे ही दोन्ही कामे सरपंच राजेंद्र राऊत यांना मिळाल्यानंतर त्यांनी ही कामे तात्काळ करून घेण्याचा निर्णय घेतला होता परंतु सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्यांना वर्कऑर्डर तर दिले परंतु आजपर्यंत मार्कऑउट टाकून दिले नसल्याने ही कामे रखडलेली आहेत. राजेंद्र राऊत यांनी या प्रकरणी जिल्हाधिकारी यांना निवेदन देवूनही सार्वजनिक बांधकाम विभागातील अभियंता यांनी अद्यापपर्यंत त्या रस्त्याचे मार्कआउट टाकून दिले नसल्याने राऊत यांनी आता आत्मदहन करण्याचा इशाराही देणार असल्याचे सांगितले आहे. पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी या प्रकरणाकडे विशेष लक्ष देण्याची गरज असून अशा राजकीय दबावात असलेल्या अधिकाऱ्यांना धडा शिकविण्याची गरज असून सार्वजनिक बांधकाम विभागातील त्या अभियंत्याने आतापर्यंत त्या रस्त्याचे मार्कआऊट टाकून का दिले नाही? यासाठी याप्रकरणाची चौकशी पालकमंत्र्यांनीच करावी अशी ग्रामस्थांतून मागणी होत आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक शेख रिजवान खलील यांनी माऊली ऑफसेट माळीवेस, बीड ता. जि. बीड ४३१ १२२ येथे छापून साप्ताहिक दिव्य आधार कार्यालय बशीरगंज, जयहिंद प्लाझा, नगरपालिकेजवळ, बीड ता. जि. बीड ४३१ १२२ येथे प्रकाशित केले आहे. मो. ९५६१८४०१८४ या अंकामधील प्रत्येक बातमी व लेखास संपादक सहमत असतीलच असे नाही, वाद-विवाद बीड न्यायालय अंतर्गत.